सोलापूर विद्यापीठ
सोलापूर पुणे महामार्ग, केगांव,
**सोलापूर** - ४१३ २५५ (महाराष्ट्र)
website:http://su.digitaluniversity.ac

**SOLAPUR UNIVERSITY**
Solapur Pune National Highway, Kegaon,
**Solapur** - 413 255 (Maharashtra)
EPABX: 0217-2744763, 66,67 Ext-114.

**Ref No:- SOL/UTY/NSS/2013-14 /** 8036 **Date: -** 20 JAN 2014

प्रति,
**मा. कार्यक्रम समन्वयक**
**महाराष्ट्रातील सर्व कृषी आणि अकृषी विद्यापीठे.**

**विषय - राज्यस्तरीय विशेष श्रमसंस्कार शिबीराकरिता स्वयंसेवक / स्वयंसेविका व संघव्यवस्थापक पाठविण्याबाबत.**

**महोदय / महोदया,**

उपरोक्त विषयानुसार आपणास कळविण्यात येते की, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, रासेयो मंत्रालय कक्ष, मुंबई व सोलापूर विद्यापीठ, सोलापूर व विठ्ठलराव शिंदे महाविद्यालय, टेंभुर्णी व ग्रामपंचायत टेभुर्णी यांच्या संयुक्त विद्यमाने दि.२५/०१/२०१४ ते ३१/०१/२०१४ या ०७ दिवसांच्या कालावधीमध्ये मौजे टेंभूर्णी गावात ३०० स्वयंसेवकांचे राज्यस्तरीय विशेष श्रमसंस्कार शिबीराचे आयोजन करण्यात आले आहे.

मा. राज्य संपर्क अधिकारी रासेयो मंत्रालय कक्ष, मुंबई यांनी या शिबीराकरिता परवानगी दिलेली आहे. उपरोक्त राज्यस्तरीय विशेष श्रमसंस्कार शिबीरामध्ये शिबीराच्या माध्यमातून निर्मलग्राम अभियान, पर्यावरण संवर्धन, वनराई बंधारे, रस्ते दुरुस्ती, प्लॅस्टीकमुक्त गावअभियान, सामूहिक स्वच्छता इत्यादी श्रमदानाची व मुली वाचवा अभियान, व्यसन मुक्ती इ. प्रबोधनपर कार्यक्रम घेणार आहेत.

या शिबीराकरिता आपल्या विद्यापीठातील ०५ मुले ०५ मुली व १ संघव्यवस्थापक असा एकुण ११ जणांचा संघ दि.२५/०१/२०१४ ते ३१/०१/२०१४ या ०७ दिवसांच्या कालावधीमध्ये मौजे टेंभूर्णी गावात पाठविण्याविषयी विनंती आहे. या शिबीराचा तपशिल, नियम व सूचना पत्रासोबत जोडलेल्या आहेत . निवड झालेल्या स्वयंसेवक / स्वयंसेविका यांची माहिती सोबत जोडलेल्या प्रपत्रामध्ये मध्ये भरुन संघव्यवस्थापकासोबत एकत्रित रित्या पाठवाव्यात प्रपत्राशिवाय आलेल्या स्वयंसेवक / स्वयंसेविकांना शिबीरामध्ये प्रवेश दिला जाणार नाही.

आपण अनुमती दर्शक पत्र व शिबीरार्थ्यांचे नांवे दि. २२/०१/२०१४ पर्यंत फॅक्स, ई-मेल अथवा पोस्टाने किंवा कुरीअरने आयोजक महाविद्यालयाकडे पाठवावेत . [सोबत शिबीराचा तपशिल, प्रपत्र, पालकांचा दाखला, शिबीरार्थी प्रतिज्ञापत्र, ई-मेल, फॅक्स क्रमांक व पत्रव्यवहारासाठीचा पत्ता दिला आहे.]

कळावे,

आपला विश्वासू,

SOLAPUR UNIVERSITY * SOLAPUR *

प्रा. डॉ. बी. एन. कांबळे
कार्यक्रम समन्वयक.
राष्ट्रीय सेवा योजना,
सोलापूर विद्यापीठ, सोलापूर.

सोबत - वरीलप्रमाणे

| शिबीराचा तपशिल | | |
|---|---|---|
| ०१ | शिबीराचे स्थळ | विठ्ठलराव शिंदे महाविद्यालय, टेभुर्णी [टेंभुणी गावामध्ये] |
| ०२ | शिबीराचा कालावधी | २५ जानेवारी २०१४ ते ३१ जानेवारी २०१४. |
| ०३ | सर्व बाहेरील शिबीरार्थींनी २४ जानेवारी २०१४ रोजी संध्याकाळ पर्यंत अथवा दि. २५ जानेवारी २०१४ सकाळपर्यंत विठ्ठलराव शिंदे महाविद्यालय, टेंभुर्णी [टेंभुर्णी गावामध्ये] उपस्थित राहावे. | |
| ०४ | सर्व शिबीरार्थीना निवास व भोजणाची व्यवस्था राहील. | |
| ०५ | महाविद्यालयीन शिबीरार्थ्यांना प्रवास खर्च नियमित रा.से.यो अनुदानातून करावा. | |
| ०६ | सोबत आणावयाचे साहित्य - पुरेसा बिछाना,रा.से.यो बॅच, डायरी, वही,पेन,टॉर्च,साबन, मंजन, कंगवा, तेल इत्यादी. ताट, वाटी, पेला , लहान चम्मच आवश्यक, वाकमन, रेडिओ, मोबाईल व किमती वस्तु आणू नये. | |
| ०७ | शिबीराची नियमावली - | |
| | अ. | शिबीरार्थी आपल्या पालकांच्या व महाविद्यालयाच्या संमतीने सहभागी होत आहे असे गृहीत धरुन शिबीरात एखाद्या अपघात वा दुखापात झाल्यास व अन्य कारणांनी शिबीरार्थ्यांनी व पालकांना नुकसान भरपाई मागता येणार नाही. |
| | ब. | शिबीरात एकदा दाखल झाल्यावर शिबीर परीसर सोडून आपल्या मर्जीप्रमाणे गावात व अन्य ठिकाणी जाता येणार नाही. |
| | क. | शिबीराच्या संपूर्ण कालावधीत शिस्त पाळावी व शांतता पाळावी. |
| | ड. | शिबीर प्रमुखांनी वेळोवेळी केलेल्या सूचनांचे पालन करावे. |
| | इ. | बेशिस्तपणा नजरेस आल्यास त्यांना शिक्षा करण्यात येईल. व त्यांचे नांव संबंधित प्राचार्यांना कळविण्यात येईल. |
| | ई. | कोणतेही धुम्रपान व गुटखा सेवन करता येणार नाही. आढल्यास कडक कार्यवाही करण्यात येईल. |
| | फ. | नेमून दिलेले काम व प्रकल्प जबाबदारीने पूर्ण करावे लागेल. |
| | ग. | प्रत्येक शिबीरार्थ्यांला प्रत्येक कार्यक्रमात सहभागी व्हावे लागेल. |
| | ह. | मोबाईलचा वापर करता येणार नाही. |
| | आपण त्वरीत अनुमती दर्शकपत्र व विद्यार्थ्यांची नांवे आयोजकाकाडे पाठवावीत ही विनंती. | |
| | धन्यवाद! | |


| | | | |
|---|---|---|---|
| प्रा.डॉ.बी.एन.कांबळे,<br>रासेयो कार्यक्रम समन्वयक<br>सोलापूर विद्यापीठ, सोलापूर<br>मो.क्र- ९४२०७८००७२ | डॉ. महेंद्र सुदाम कदम<br>प्राचार्य, विठ्ठलराव शिंदे महाविद्यालय, टेभुर्णी<br>मो.क्र - ९०११२०७०१४<br>कार्यालय -०२१८३-२३२२३२<br>ई-मेल prinvsact@gmail.com<br>फॅक्सक्र.०२१८३-२३२१२६ | प्रा. सुहास पाटील<br>रासेयो विभागीय समन्वयक<br>मो.क्र- ९४२२४६३८५१ | प्रा. काळे विजय प्रकाश<br>रासेयो कार्यक्रम अधिकारी<br>विठ्ठलराव शिंदे महाविद्यालय, टेभुर्णी<br>मो.क्र-९२२५७६७१६९ |

पत्रव्यवहारासाठी पत्ता -
मा. प्राचार्य,
विठ्ठलराव शिंदे कला महाविद्यालय, टेंभुर्णी
ता.माढा, जि.सोलापूर - ४१३ ४११


कार्यक्रम समन्वयक,
राष्ट्रीय सेवा योजना,
सोलापूर विद्यापीठ, सोलापूर.

**Solapur University, Solapur**
**Solapur Pune National Highway**
**Solapur-413 255.(Maharashtra)**
**EPABX: 0217 – 2744763,66,67 EXT – 114, Fax : 091-0217 - 2744770**

SOLAPUR UNIVERSITY * SOLAPUR *

Photo

NATIONAL SERVICE SCHEME

| | | |
|---|---|---|
| **1.** | Name of the Student | |
| **2.** | Name of the College | |
| **3.** | Class | |
| **4.** | Blood Group | |
| **5.** | Date of Birth | |
| **6.** | Home Address of the Students | |
| **7.** | (With Telephone No. if Available ) | |
| **8.** | Experience in N.S.S. | |
| **9.** | Languages Known | |
| **10.** | Number of Camp / Attended | |
| **11.** | Hobby | |
| **12.** | Special Skill / Arts | |
| **13.** | Any other activities | |
| **14.** | Interesting Field | |
| **15.** | Remarks | |

Signature of N.S.S Volunteers

Signature of the Programme Officer
N.S.S.

Signature of Principal and Seal

# पालकांचा दाखला

श्री. ---------------------------------------------------- रा. --------------------आपणास लिहून देतो /

देते की, माझा / माझी पाल्य/पाल्या श्री/कु. ------------------------------------------------------------

उच्च व तंत्र शिक्षण विभाग, रासेयो मंत्रालय कक्ष, मुंबई व सोलापूर विद्यापीठ, सोलापूर व विठ्ठलराव शिंदे महाविद्यालय, टेंभुर्णी व ग्रामपंचायत टेभुर्णी यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजीत राज्यस्तरीय विशेष श्रमसंस्कार शिबीराकरिता दि.२५/०१/२०१४ ते ३१/०१/२०१४ या ०७ दिवसांच्या कालावधीमध्ये मौजे टेंभूर्णी गावामध्ये होणा-या शिबीरात सहभागी होत आहे. त्याने / तिने घर सोडल्यापासून तो/ती परत घरी येई पर्यतच्या काळात कोणत्याही प्रकारचा अपघात किंवा हानी, ईजा झाल्यास महाविद्यालय, कार्यक्रम अधिकारी, विद्यापीठ अथवा शासनाकडे दावा करणार नाही.

आपला / आपली विश्वासु,

नांव -

# शिबीरार्थी प्रतिज्ञापत्र

मी. ------------------------------------------------------------ महाविद्यालय -------------------------

---------------------------------- या महाविद्यालयातील स्वयंसेवक / स्वयंसेविका असुन उच्च व तंत्र शिक्षण विभाग, रासेयो मंत्रालय कक्ष, मुंबई व सोलापूर विद्यापीठ, सोलापूर व विठ्ठलराव शिंदे महाविद्यालय, टेंभुर्णी व ग्रामपंचायत टेभुर्णी यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजीत राज्यस्तरीय विशेष श्रमसंस्कार शिबीराकरिता दि.२५/०१/२०१४ ते ३१/०१/२०१४ या ०७ दिवसांच्या कालावधीमध्ये मौजे टेंभूर्णी गावामध्ये होणा-या शिबीरात सहभागी होत आहे. या शिबीरादरम्यान मी शिबाराची शिस्त पाळीन तसेच सर्व नियमांचे काटेकोरपणे पालन करील. कोणत्याही प्रकारच्या गैरवर्तुनुकीस मी अपात्र ठरेल. याची मी खात्री देतो / देते.

शिबीरातील स्वयंसेवक /स्वयंसेविका

नांव -